**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५४/२०१६-१७/११४ दिनांक: २३.०३.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ५४/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कुमार भिकाजी पैलवान :<br>मु. पो. मणेराजूरी<br>ता. तासगांव , जिल्हा. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सांगली ग्रामिण विभाग | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग सावळज | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री कुमार भिकाजी पैलवान रा. मणेराजूरी ता. तासगांव जि. सांगली यांनी त्यांना कृषि संजीवनी योजनेचा लाभ देऊन शेती पंपाच्या वीज जोडणीस मीटर बसवणेचा आदेश करावा यासाठी हे अपिल दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) शेती पंप वीज जोडणी ग्राहक क्र. २८२६७०३९८०३५ ही तक्रारदार यांचे वडील भिकाजी एकनाथ पैलवान यांचे नावे असून त्यांचा दि. २०.०३.२०१३ रोजी मृत्यू झाला आहे. वितरण कंपनीने जाहिर केलेल्या कृषी संजीवनी योजनेचा लाभ घेण्यासाठी तक्रारदार यांनी पहिला हप्ता रु. ७,६००/- दि. ३१.१०.२०१४ रोजी वि.प.कडे भरणा केला. वि. प. यांनी सदर योजनेप्रमाणे दुसरा हप्ता देयक काढून ते तक्रारदार यांचे कडून भरुन घेणे गरजेचे असूनही वि.प. यांच्या कर्मचा-यांनी पुढील कार्यवाही सदोष पध्दतीने करुन तक्रारदार यांना सदर योजनेचा लाभ मिळू दिला नाही. तक्रारदार यांनी दिनांक १७.११.२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला. सदर कक्षाने दिनांक ११-०१-२०१७ च्या निर्णयानुसार तक्रारदार यांची मागणी अमान्य केली असल्याने या मंचासमोर प्रस्तुत अपिल दि. ३१.०१.२०१७ रोजी दाखल करण्यात आले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

३) महावितरण कंपनीने शेतीपंप ग्राहकांना दि. २०-०६-२०१४ च्या परिपत्रकानुसार कृषी संजीवनी योजना
जाहिर केलेली होती. त्यानुसार डिसेंबर २०१३ अखेर तक्रारदार यांचेकडून मूळ थकबाकी रु. ११,७५१.११ पै. आणि व्याज व दंडाची रक्कम रु. ४,८८३.२६ पै. इतकी येणेबाकी होती. सदर योजनेनुसार तक्रारदार यांनी मूळ थकबाकीची ५० टक्के रक्कम एकरकमी अथवा विशिष्ट हप्ते पध्दतीने भरुन चालू बिलांची पूर्ण रक्कम भरणा करणे आवश्यक होते. तथापि, तक्रारदार यांनी योजनेच्या लाभास पात्र होण्याकरिता एकूण रु. ८,४९६.७९ पै. भरणे आवश्यक असताना फक्त रु. ७,६००/- रक्कम भरणा केली. वरील योजनेस मार्च २०१६ पर्यन्त मुदतवाढ मिळाली होती. परंतु ग्राहकाने आवश्यक रक्कम व चालू बिलाची रक्कम मुदतीत भरणा केली नसल्याने त्यांना सदर योजनेचा लाभ मिळू शकला नाही.

४) या अपिलाची सुनावणी दि. २१.०३.२०१७ रोजी मंचासमोर घेणेत आली त्यावेळी तक्रारदार स्वतः आणि त्यांचे प्रतिनिधी श्री अलमशहा मोमीन हजर होते. त्यांनी त्यांच्या तक्रारीस अनुसरुन तोंडी युक्तिवाद केला. वि.प. तर्फे श्री प्रविण दिक्षीत उपविभाग अधिकारी आणि श्री प्रताप जाधव उपव्यवस्थापक(विवले) हजर होते. त्यांचेही तोंडी निवेदन ऐकणेत आले.

उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) तक्रारदार यांचे गा-हाणे, वि.प. यांचे म्हणणे, उपलब्ध सर्व कागदपत्रे आणि तोंडी युक्तिवादाचा विचार करता या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या विनंतीनुसार कृषी संजीवनी योजना २०१४ या वि.प. यांच्या जाहिर केलेल्या योजनेचे लाभ देणेत यावेत असा आदेश आता वि. प. यांना देणे योग्य व संयुक्तिक होईल काय?

उत्तरः- नाही.

२) तक्रारदार यांची त्यांच्या सदरच्या शेतीपंप वीज जोडणीस वीज मिटर बसवून मिळणेची मागणी मान्य करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांचे मयत वडील भिकाजी एकनाथ पैलवान (मृत्यू दि. २०.०४.२०१३ ) यांचे नावे शेती पंपाची ग्राहक क्र. २८२६७०३९८०३५ ही वीज जोडणी चालू आहे. त्यांचे तीन मुलगे कुमार , सुकूमार व उत्तम यापैकी श्री कुमार यांनी प्रस्तुत तक्रार दाखल केली आहे. सन २०१४ मध्ये महावितरण कंपनीने शेतीपंप वीज जोडण्या वरील थकबाकीचे संदर्भात कृषी संजीवनी योजना जाहीर करुन थकबाकी धारकांना काही शर्तीवर सवलत देऊ केली होती. सदर योजना वि.प. यांचे परिपत्रक क्र. २२३ दि. २०.०६.२०१४ नुसार जाहीर करणेत आली. त्यावेळेस तक्रारदार यांचेकडून मूळ थकबाकी रु. ११,७५१.११ पै. आणि व्याज व दंडाची रक्कम वि.प. यांना येणे होती. त्यानंतर तक्रारदार यांनी सदर योजनेनुसार आपणास लाभ मिळावा अशी विनंती करुन ३१.१०.२०१४ रोजी वि.प. यांच्याकडे रु. ७,६००/- भरणा केले. त्यानंतर दि. ०५.०६.२०१५ रोजी रु.२,०००/- जमा केल्याचे दिसून येते. वि. प. यांचे कर्मचा-यांनी पुढील कार्यवाही सदोष पध्दतीने करुन आपणास वरील योजनेचा लाभ मिळू दिला नाही  अशी तक्रारदार यांची मुख्य तक्रार या मंचासमोर आहे.

७) रु. ७,६००/- या रक्कमेचे डुप्लीकेट बिल पाहिले असता असे दिसते की, कृषी संजीवनी योजनचा (KSY)पहिला हप्ता आणि मार्च व जूनचे बिलापोटी एकूण रु. ७,६००/- तक्रारदार यांचेकडे  Part Payment (PP)  म्हणून भरुन घेणेसाठी सदर देयक देणेत आले होते. वि.प. यांच्या मुद्देनिहाय लेखी जबाबात असे नमूद केले आहे की, तक्रारदार यांनी दि. ३१.१०.२०१४ पर्यन्त एकूण रु. ८,४९६.७९ पै. भरणे जरुर होते. परंतु त्यांनी फक्त रु. ७,६००/- भरणा केले. तक्रारदारतर्फे असे निवेदन करणेत आले की, त्यांना वि.प. यांच्या कर्मचा-यांनी रु. ८,५००/- भरणे जरुर आहे असे सांगितले नव्हते अन्यथा त्यांनी रु. ८,५००/-  त्याच दिवशी भरणा केले असते. वि. प. तर्फे असे सांगणेत आले की, डुप्लीकेट बिलावर PP(Part payment) असा स्पष्ट उल्लेख केला आहे. तक्रारदार यांचे म्हणणे वरील प्रमाणे असले तरी त्यांनी योजनेच्या शर्तीनुसार संपूर्ण रक्कम दिनांक ३१.१०.२०१४ पर्यन्त भरली नव्हती हे स्पष्ट होते. अशा सवलत योजना राज्य शासन अथवा महाविरण कंपनी जेव्हा विशिष्ट शर्तीवर जाहिर करते तेव्हा त्यांच्या अटींची पूर्तता होणे गरजेचे असते. अशा योजना वृत्तपत्रांतून , दूरचित्रवाणी वरुन आणिअन्य प्रकारे प्रसिध्द केल्या जातात. या प्रकरणात कृषी संजीवनी योजनेच्या शर्तीची माहिती तक्रारदार यांना नव्हती हे म्हणणे स्विकारता येत नाही.

८) वि.पं. तर्फे निवेदन करणेत आले आहे की, कृषी संजीवनी योजना २०१४ यापूर्वीच बंद करण्यात आली आहे आणि सदर योजनेप्रमाणे ज्या शेतक-यांनी शर्तीनुसार ५०टक्के मूळ थकबाकी संबंधीत वीज देयकांसह मुदतीत भरली होती त्यांची उर्वरीत ५०टक्के मूळ थकबाकी शासनाने वितरण कंपनीस प्रदान केली होती.

९) तक्रारदार यांनी पुढील वीज देयके भरलेली नव्हती असेही दिसून येत आहे. त्यांनी केवळ दिनांक ०५.०६.२०१५ रोजी रु. २,०००/- भरले होते असे दिसून येते. त्यापूर्वीची त्रैमासिक वीज देयके त्यांनी भरली नव्हती. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना वीज देयके मिळाली नव्हती . परंतु हे म्हणणे स्विकारता येत नाही. त्यांनी डुप्लीकेट बिलांची मागणी करुन अशी त्रैमासिक वीज देयके भरणे आवश्यक होते. त्यामुळे सदर योजनेच्या शर्तीचे त्यांचेकडून योग्यरित्या पालन झालेले नाही. एकंदरीत, दि. ३१.०३.२०१६ पर्यन्त तक्रारदार यांनी एकूण रु. १२,८५०/- इतकी रक्कम भरणे आवश्यक असताना त्यांनी रु. ९,६००/- एवढीच रक्कम जमा केली असे दिसून येते. त्यांनी रु. ३,२५०/- कमी भरल्यामुळे त्यांना सदर योजनेचा लाभ मिळाला नाही असे ही दिसते. आता तर सदर योजनाच बंद झालेली आहे.

१०) उपरोक्त सवलत योजना मार्च २०१६ पर्यन्त चालू राहिली होती. म्हणजे तक्रारदार यांना योजनेप्रमाणे देय रक्कम भरण्यास भरपूर कालावधी उपलब्ध होता. परंतु दुर्देवाने त्यानी मार्च २०१६ पर्यन्त संपूर्ण रक्कम जमा केली नसल्याने योजनेचा फायदा मिळाला नाही. तक्रारदार यांनी काही प्रमाणात जागरुकता दाखवली असती तर त्यांना सदर योजनेचे निश्चितपणे फायदे मिळाले असते. वरील सर्व कारणास्तव तक्रारदार यांची योजनेचा लाभ मिळणेची मागणी मंजूर करता येत नाही असे अध्यक्षाचे स्पष्ट मत आहे.

११)तथापि, तक्रारदार यांची वीज मिटर बसवून मिळणेची मागणी निश्चितपणे मान्य करता येईल. वीज मिटर अद्याप का बसवून दिले नाही याबद्दल वि.प. तर्फे दिलेले निवेदन असे की, वीज मिटर बसविणेत कर्मचारी गेले असता इतरांनी हरकत घेतली होती. तथापि हे निवेदन स्विकारता येत नाही. वि. प. यांनी वीज मिटर बसवून द्यावे असा आदेश करणे उचित होईल असे वाटते.

वरील परिस्थितीत, खालील प्रमाणे अंतिम आदेश करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदार श्री कुमार भिकाजी पैलवान, रा. मणेराजूरी ता. तासगांव जि. सांगली यांना ग्राहक क्र. २८२६७०३९८०३५ या वीज जोडणीस पंधरा दिवसांचे आत नविन वीज मिटर बसवून द्यावे असा वि.प. यांना आदेश देणेत येतो.

२) सदर तक्रारदार यांची, कृषी संजीवनी योजना २०१४ प्रमाणे सवलत मिळणेची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

मी प्रसाद स. बुराडे ग्राहक सदस्य, मा. अध्यक्ष यांच्या मताशी मी सहमत अंशतः आहे. मा. अध्यक्षसाो यांच्या आदेश क्रमांक एकशी सहमत असून आदेश क्रमांक दोन बाबत मी माझे वेगळे मत देत आहे. तो या निकालाचा भाग समजण्यात यावा. **<u>(पुढील पानावर वेगळे मत देण्यात आलेले आहे)</u>**

सही/-
(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

**श्री. प्रसाद बुरांडे, ग्राहक सदस्य, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर केस क्र. ५४/१६-१७ दि.२३-०३-२०१७ चा न्याय निर्णय मला अंशत:मान्य नाही. सबब मी माझे या आदेशाबाबत वेगळे मत देत आहे. कृपया तो या निर्णयाबाबत निकालाचा भाग समजावा.**

सदर निकालपत्रामध्ये मांडलेले गा-हाण्याचे सांक्षिप्त स्वरुप आणि वि.प. ची भूमिका यातील मुद्दा क्र.५ पर्यन्त मी सहमत आहे.

शेतकरी ग्राहकाने आपणास शासनाने जाहीर केलेल्या कषी संजीवनी या योजनेचा लाभ मिळावा मी योजनेनुसार वेळेतपूर्ण पैसे भरलेले आहेत. माझ्या वर अन्याय झालेला आहे. मी भरलेल्या पैशाचा हिशोब कुठेच दिसत नाही. असे म्हटले आहे.ज्यावेळी मला दुसरे डयुप्लीकेट बिल मिळाले त्यावेळी मी रु. २०००/- दिनांक १५-०६-२०१५ रोजी भरलेले आहेत.त्याचवेळी मला आणखी पैसे भरा असे सांगितले असते. तर मी भरले असते. मला बिले आलेली नाहीत आणि कोणतीही सूचना पण संबंधीत कर्मचारी अधिकारी यांनी दिली नाही.असे तोंडी सांगितले यावर हजर श्री दिक्षीत यानी मी त्यावेळी येथे नव्हतो त्यावेळचे मला काही माहित नाही. असे सांगितले. आम्ही यावर म.रा.वि.वि.कं.मर्या. मणेराजूरी यांना ग्राहकाने दि. १६-०५-२०१५ रोजी दिलेल्या अर्जात पुन्हा कृषि संजीवनी लाभ मिळावा मी भरलेले रु. ७,६००/- वजावट करुन मिळावे असे म्हटले आहे. त्याची रितसर पोच ही आहे पण त्याचेही उत्तर अगर किती पैसे भरले याचा काहीच खुलासा मंचासमोर झ ाला नाही. कंपनीमार्फत मंचास सादर झालेल्या पत्राची प्रत ग्राहकास दिल्याचे दिसून येत नाही.सुनावणीचे वेळी योजने अंतर्गत ग्राहकाच्या भरलेल्या पैशाचा हिशोब दाखविण्यारी CPL हजर केली नाहीत. ग्राहकाने ज्यावेळी रु. ७,६००/- व रु. २,०००/- भरले आहेत ती बिले पण डयुप्लीकेट आहेत. यांचा अर्थ कपंनीमार्फेत बिल दिली जात नव्हती होती आणि ग्राहक बिले मागून घेतो असाच होतो.

वरील सर्व बाबी विचारातय घेता खालील मुद्दा निर्णयास येतो.

१) तक्रारदार याना" कृषी संजीवनी योजना २०१४"चा लाभ देता येईल का?
   उत्तर:- होय

## कारणमिमांसा

महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१४/प्र.क्र.१४८/उर्जा-५ दि. १९-०६-२०१४ च्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कं.मर्या. यांनी परिपत्रक क्र.२२३ दि. २०-०६-२०१४ परिपत्रक क्र.२२९ दि. १२-०९-२०१४ परिपत्रक क्र. २३४ दिनांक २०-१२-२०१४ परिपत्रक क्र. २५१ दिनांक २४-११-२०१५ अशी विविध परिपत्रके काढून शासन निर्णयाची परिपूर्ण अंमलबजावणी करण्याचे ठरविले होते. पण या केसच्या संबंधीत अधिका-यांनी यांची अंमजबजावणी या केसच्या संबंधी केलेली दिसत नाही. त्यामुळे ग्राहकावर अन्याय झालेला स्पष्टपणे दिसून येतो.दिनांक २०-०६-२०१४ च्या परिपत्रक क्र.२२३ नुसार खालील प्रमाणे

१) हया योजनेसाठी चालू (Live) कृषी ग्राहकाना त्यांच्या दि. ३१-०३-२०१४ पर्यन्तची मूळ रक्कमेची ५० टक्के एकरकरमी किंवा तीन मासिक हप्त्यामध्ये भरली तर उरलेली ५०टक्के मुळ थकीत रक्कम महाराष्ट्र शासनातर्फे महावितरणला विद्युत कायदा २००३ कलम ६५ प्रमाणे रोखीने व समप्रमाणात अनुदान स्वरुपात अदा करण्यात येईल. तसेच या योजनेमध्ये भाग घेण्याचा कृषी ग्राहकाचे दि.३१-०३-२०१४ रोजी थकीत असलेले पूर्ण व्याज व दंड हे महावितरण कंपनीतर्फे माफ करण्यात येईल.

२) कृषी ग्राहकाना ५०टक्के मुळ थकबाकीची रक्कम खालील प्रमाणे हप्त्यामध्ये भरावयाची आहे.
   अ) ३१ ऑगस्ट २०१४ कमीत कमी २० टक्के

ब) ३० सप्टेंबर २०१४ कमीत कमी २० टक्के
क) ३१ ऑक्टोंबर २०१४ कमीत कमी १० टक्के

तसेच कलम ३ नुसार सहभागी झालेल्या कृषी ग्राहकाना १ एप्रिल २०१४नंतरची सर्व चालू विज बिले पूर्णपणे व नियमित भरणा करणे आवश्यक आहे. हे परिपत्रक व शासन निर्णय आणि कंपनीने स्वत: सादर केलेले सावळज चे S/DN Ason १३-०८-२०१४ BU ४७८९नसार २८२६७०३९८३५ मूळ थकबाकी ११,७५१.११ अधिक व्याज ४,६४८.२४ डीपीसी रु. २३५.०२ यापैकी Pr Arrears Rs. ५,८७५.५५ हे दि. ३१-१०-२०१४ पूर्वी भरणे आवश्यक आहे. हे दिसते त्याप्रमाणे ग्राहकाने दि. ३१-१०-२०१४ रोजी रु. ७,६००/- पावती क्र. ८७८४८८३ नुसार भरलेले आहेत. आणि यांच्या याच दिनाक. ३१-०७-२०१४ च्या Duplicate बिलावर KSY १st Inst.+ March & June bill असा उल्लेखही आहे. म्हणजे ५,८७५.५५ + ७८०.१२ मार्च बिल + जून ८३८.९८ एकूण ७,४९४.६५ ऐवजी ग्राहकाने ७,६००/- भरलेले आहेत. म्हणजे ग्राहकाने रु. १०४.३५ हे जादाच भरले आहेत. सबब हा ग्राहक कृषी संजीवनी योजना २०१४ या योजनेस १०० टक्के पात्र आहे.

महावितरणने दि. २३.०२.२०१७ च्या पत्रानुसार ग्ाहकाने भरावयाची सादर केलेली रक्कम रु. ८,४९६.७९ ही कोठून आली याचा खुलासा होत नाही. कृषी संजीवनी योजना २०१४ ही योजनेला दिनांक ३१.०३.२०१६ पर्यन्त मुदत वाढ देण्यात आलेली होती. या मध्येच ग्राहकाने दि. ०८-०५-२०१५ चे डयुप्लीकेट बिल रु. २०००/- दि.१५.०६.२०१५ ला भरलेले आहेत. हे बिल भरण्यापूर्वी दि. १६.०५.२०१५ ला ग्राहकाने मी बिल भरलेले असून मला या योजनेचा लाभ मिळावा अशी विनंती केली आहे. त्यावेळी लाभ मिळावा अशी विनंती केली आहे.त्याचवेळी जर सर्व तपशील सखोल पाहिला असता थकीत रक्कम मागितली असती तर ग्राहकावर हा अन्याय झालाच नसता.

वरील सर्व बाबी पहाता आम्हास असे वाटते की, सदर ग्राहक कृषी संजीवनी योजनेनुसार १००टक्के पात्र आहे. महावितरणच्या अंतर्गत सेवेतील त्रुटीमुळे आणि अंमलबजावणी करण्याच्या अधिकारी कर्मचा-यांच्या चुकीमुळे हा ग्राहक योजनसे पात्र असून ही लाभापासून वंचित राहिला आहे.

दिनांक ३१.१०.२०१४ रोजी हा ग्राहक लाभार्थी म्हणून पात्र आहे. या तारखेपासून आलेली चालू बिले ग्राहकाकडून भरुन घेण्यात यावीत याला कोणीतीही डीपीसी व्याज इतर आकार लावण्यात येऊ नयेत. ग्राहकाने आता पर्यन्त भरलेली सर्व रक्कम योग्य त-हेने कृषी संजीवनी लाभार्थी म्हणून समायोजित करण्यात यावीत उर्वरीत येणे रक्कम असेल तर समान पाच हप्त्यात ग्राहकाकडून चालू बिला बरोबर वसूल करण्यात यावी. दंड व्याज डीपीसी लावूनये. परिपत्रक क्र.२५१ दि. २४-११-२०१५ नुसार कृषि ग्राहकांना सुलभ हप्ते हवे असल्यास ग्राहकांच्या विनंतीनुसार मार्च २०१६ अखेर सर्व रक्कम वसूल होईल असे मासिक हप्ते द्यावेअसे म्हटले आहे. इकडे ही दुर्लक्ष केले आहे.

सबब ज्या अधिका-यांनी या ग्राहकाला या योजने पासून वंचित ठेवले त्या कसूरदार अधिका-यावर नियमाप्रमाणे कारवाई व्हावी.

## आदेश

ग्राहकास कृषी संजीवनी योजनेचा लाभ देण्यात यावा.

**सही/-**

**दिनांक : २३.०३.२०१७**

**( प्रसाद बुरांडे )**
**सदस्य ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर**